# चांद्रसेनीय कायस्थ प्रभु एज्युकेशन सोसायटी

१०१, पहिला मजला, क्षितिज, शिवसेना भवन पथ, दादर (प), मुंबई - ४०० ०२८.

दूरध्वनी क्र. : ९९६९५२८३०७ E-mail : ckpeducationsociety@gmail.com


---

## -: निवडणूक कार्यक्रम :-

सप्रेम नमस्कार वि. वि.,

चां. का. प्रभु एज्युकेशन सोसायटीच्या सन २०२५-२८ या मुदतीकरीता, संस्थेच्या घटना कलम ७ (ब) नुसार, अधिकारी मंडळाच्या पुढील जागांसाठी निवडणूक शनिवार, दि. १३ सप्टेंबर २०२५ रोजी सायंकाळी ३.०० ते ६.०० यावेळेत घेण्यात येणार आहे. तसेच संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. १४ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १०.०० वा. घेण्यात येणार आहे.

विश्वस्त - ५, अध्यक्ष - १, उपाध्यक्ष - १, कार्यकारी मंडळ सदस्य-१३, अंतर्गत हिशेब तपासनीस - २.
नियमानुसार निवडणुकीचा कार्यक्रम पुढीलप्रमाणे ठरविण्यात आला आहे.

**निवडणुकीचा तपशीलवार कार्यक्रम :**

१) दि. ३१ मार्च २०२५ रोजी संस्थेच्या पटावर असलेल्या सभासदांची यादी दि. १ ऑगस्ट २०२५ पासून संस्थेच्या कचेरीत ठेवली जाईल. ज्या सभासदांना ही यादी पहावयाची असेल त्यांना संस्थेच्या कार्यालयीन वेळांत (रविवार व संस्थेने जाहीर केलेले सुट्टीचे दिवस वगळून) पहावयास मिळेल.

२) दि. १ ऑगस्ट २०२५ ते १३ ऑगस्ट २०२५ पर्यंत निवडणुकीस उभे राहू इच्छिणाऱ्या सभासदास प्रत्येकी एक अर्ज संस्थेच्या कार्यालयीन वेळांत विनामूल्य दिला जाईल. प्रत्येक अधिक अर्जास रु. १/- द्यावे लागतील. निवडणूक लढवू इच्छिणारी व्यक्ती ही संस्थेची सभासद असणे बंधनकारक आहे.

३) निवडणुकीस उभे राहू इच्छिणाऱ्या उमेदवारांचे अर्ज दि. १ ऑगस्ट २०२५ ते १३ ऑगस्ट २०२५ पर्यंत (रविवार व संस्थेने जाहीर केलेले सुट्टीचे दिवस वगळून) संस्थेच्या कार्यालयीन वेळांत स्विकारण्यात येतील.

४) दि. २० ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १२.०० वाजता संस्थेच्या कार्यालयात निवडणूक समिती आलेल्या अर्जाची छाननी करतील. ज्या उमेदवारांनी अर्ज भरले असतील त्यांना यावेळी उपस्थित राहता येईल.

५) दि. २० ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजता निवडणुकीस पात्र असलेल्या उमेदवारांची यादी संस्थेच्या सुचना फलकावर लावण्यात येईल.

६) ज्या उमेदवारांचे अर्ज नामंजूर झाले असतील अशा उमेदवारांना दि. २५ ऑगस्ट २०२५ पर्यंत याबाबतची आपली लेखी तक्रार (Appeal) संस्थेचे अध्यक्ष यांच्याकडे संस्थेच्या कार्यालयाच्या वेळांत करता येईल.

७) दि. २८ ऑगस्ट २०२५ पर्यंत संस्थेचे अध्यक्ष याबाबतचा आपला निर्णय व्यवस्थापक मंडळास लेखी कळवतील.

८) दि. २८ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत उमेदवारास, आपला उमेदवारी अर्ज सुचक व अनुमोदकांच्या लेखी संमतीने मागे घेता येईल.

९) निवडणुकीस पात्र असलेल्या उमेदवारांची अंतिम यादी संस्थेच्या सुचना फलकावर दि. २८ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजता लावण्यात येईल.

१०) निवडणूकीस पात्र असलेल्या उमेदवारांची संख्या निवडावयाच्या जागां इतकी अथवा कमी असल्यास हे उमेदवार बिनविरोधक निवडून आल्याचे समजण्यात येईल व त्याप्रमाणे वार्षिक सर्वसाधारण सभेच्या दिवशी निवडणूक निर्णय अधिकारी तसे जाहीर करतील.

११) निवडणूक झाल्यास, निवडणूकीस मतदान करण्याचा हक्क बजावण्यासाठी आपण आपले संस्थेचे दिलेले ओळखपत्र, पासपोर्ट, पॅन कार्ड वाहन चालक परवाना, भारत निवडणूक आयोगाने दिलेले ओळखपत्र, स्वातंत्र्य सैनिक ओळखपत्र ह्यापैकी कुठलाही एक पुरावा सोबत आणणे आवश्यक आहे. अपवादात्मक बाबतीत, वरीलपैकी कोणताही पुरावा नसल्यास मतदानाचा हक्क बजावण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी ह्या बाबतचा आपला निर्णय घेतील व असा निर्णय सभासदांस बंधनकारक राहील.

**व्यवस्थापक मंडळाच्या आदेशावरुन**
**(अजित प्र. कोंढवीकर)**
कार्यवाह

**चां. का. प्रभु एज्युकेशन सोसायटी,**
१०१, पहिला मजला, क्षितिज, शिवसेना भवन पथ,
दादर (प.). मुंबई - ४०० ०२८.
दिनांक : १५ जुलै २०२५

**संस्थेच्या कार्यालयाची वेळ : सोमवार ते शनिवार सकाळी १०.०० ते ६.००**
**(रविवारी साप्ताहीक सुट्टी)**